# जाहीर नोटीस

सर्व लोकांना कळविण्यात येते की, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपुर अतंर्गत जिगांव प्रकल्पाअतंर्गत मौजे तिवडी अजमपूर ता. जळगाव जामोद चे नविन गावठाणाकरीता मौजे पिंपळगाव काळे ता. जळगाव जा. येथील खालील वर्णनीत शेतजमीन, ज्याचा भुसंपादन प्र.क्र. १३/२००९-१० हा असुन या प्रकरणातील खाजगी जमीनीची सरळ खरेदी व्यवहाराने खरेदी करण्याचे प्रस्तावित असल्याने त्याबाबतच्या आक्षेप व हरकती मागविण्याबाबत सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहे.

सोबत प्रसिद्धीस दिलेल्या यादीतील जमीन मालकांनी/धारकांनी व नमुद केलेल्या शेतजमीनीशी ज्यांचा हितसंबध आहे, अशा सर्व ज्यामध्ये सर्व बँक, पतसंस्था, खाजगी व्यक्ती, वारस व इतर संबंधीत आदींचा समावेश आहे. असे अधिकार अभिलेखावरुन दिसते. अशा सर्व लोकांनी/ व्यक्तींनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासुन १४ दिवसाचे आत लेखी स्वरुपात आवश्यक त्या सर्व दस्तऐवजांसह खालील नमुद पत्त्यावर याबाबत आक्षेप व हरकती दाखल कराव्यात. या शिवाय सदर हरकती कार्यालयीन वेळेत जिगांव प्रकल्प पुनर्वसन विभाग, खामगांव, अकोला रोड खामगांव जि. बुलडाणा कार्यालय येथे सुद्धा आक्षेप/हरकती दाखल कराव्यात. ठरावीक कालावधीनंतर येणाऱ्या आक्षेप/हरकतींचा विचार केला जाणार नाही व सदरील जमीनीची सरळ खरेदी व्यवहार संबंधीतांशी केल्या जाईल याची नोंद घ्यावी.

सोबत जमीन मालकांची त्यांचे ७/१२ नुसार गटनिहाय प्रस्तावित खरेदी करावयाच्या क्षेत्रासह माहिती प्रसिद्धीस दिली आहे.

**ॲड. राजेश एन. गवई**

-ऑफिस पत्ता-

सिव्हील लाईन, मोठ्या विहीरीजवळ

सप्तश्रृंगी माता मंदिराच्या बाजुला

**कार्यकारी अभियंता**

जिगांव प्रकल्प पुनर्वसन विभाग

खामगांव

**कार्यालयीन पत्ता:-** कार्यकारी अभियंता, जिगांव प्रकल्प पुनर्वसन विभाग, खामगांव पाटबंधारे वसाहत, अकोला रोड, जनुना, पोस्ट-टेंभुर्णा ता. खामगांव जि.बुलडाणा.

Scanned by CamScanner